क्र. कॉन/ शु.प./ए-३/२०००
जमाबंदी आयुक्त आणि संचालक ,
भूमि अभिलेख (म.रा.)यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
पुणे १ दिनांक - १३/११/२०००

परिपत्रक

**विषयः शुध्दिपत्रकाच्या दोषाबाबत ......**

बाबासाहेब कुतूबुद्दीन मुल्ला, मौजे-गोरवार, तालुका-शिरोळ , जिल्हा-कोल्हापूर यांनी मा.प्रधान सचिव व विशेष कार्यअधिकारी , (अपीले) महसूल व वन विभाग,महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे, उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश पुणे यांनी मंजूर केलेल्या शुध्दी पत्रका विरुध्द अपील केले होते.

उपसंचालक भूमि अभिलेख,पुणे प्रदेश पुणे यांनी शुध्दी पत्रक मंजूर करतांना गट नंबर चे क्षेत्रामध्ये बदल केलेला आहे. त्या बाबत मा.प्रधान सचिव व विशेष कार्यअधिकारी (अपील)महसूल व वन विभाग , महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी एकत्रीकरण कायदयाच्या कलम ३१अ प्रमाणे फक्त गणिती चुक अथवा नजर चुकीने/ हस्त दोषाने झालेल्या चुका या बाबत वरील कलमा अन्वये दुरुस्ती करता येते. त्यामध्ये क्षेत्र दुरुस्ती सारखे मोठया प्रमाणातील दोष मात्र दुरुस्त करता येणार नाही असे नमूद करून सदरच्या दुरूस्त्या , एकत्रीकरण कायदयाच्या कलम ३२(१) अन्वये दुरुस्त कराव्यात असे आदेश दिले आहेत. सदरच्या आदेशा विरुध्द मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचे कोर्टात दावा दाखल झाला असता मा. कोर्टाने, मा.प्रधान सचिव यांचा आदेश कायम करुन क्षेत्र दुरुस्ती बाबत,गटाच्या दुरुस्ती बाबत कायदा कलम ३२(१ )खाली दुरुस्त केली पाहिजे असे आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र शासन , महसूल व वन विभाग , मंत्रालय , मुंबई यांचे कडील अधिसूचना क्रमांक सी.ओ.एन.१०९८/७६३/सी.आर.९८/ल-१ दिनांक ५/२/२००० अन्वये , मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम १९४७ च्या कलम ३१ अ अन्वये शुध्दिपत्रक मंजूर करण्याचे अधिकार सर्व जिल्हयांचे अधीक्षक भूमि अभिलेख यांना निहित केलेले आहेत. तरी अधीक्षक भूमि अभिलेख यांनी कलम ३१ अ अन्वये शुध्दीपत्रक मंजूर करताना केवळ अंकगणीती चुका, नजरचुकीने अथवा हस्तदोषाने झालेल्या चुका अशा स्वरूपाच्या चुका असतील तरच शुध्दिपत्रक मंजूर करावे. कोणत्याही परिस्थितीत क्षेत्र, हद्द दुरूस्तीचे अधिकार अधीक्षक भूमि अभिलेख यांना नसल्याने त्याबाबत त्यांनी शुध्दीपत्रक मंजूर करू नये. गटाचे क्षेत्र दुरूस्तीचे अधिकार

जमाबंदी आयुक्त यांना असल्याने अशा सर्व प्रकरणात एकत्रीकरण कायदयाच्या कलम ३२ (१) अन्वये क्षेत्र दुरूस्तीचे प्रस्ताव तयार करून ते योग्य मार्गाने मंजुरी करिता या कार्यालयाकडे सादर करावेत.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

---

(स्वाक्षरी------)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख,(म.राज्य)पुणे.

प्रत- उपसंचालक भूमि अभिलेख (सर्व )
प्रत- अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व )
प्रत- तालुका निरीक्षक भूमि अभिलेख (सर्व )

१५-११-२०००

"नि र्ग मि त"

(डि.डि.मडके)
जमाबंदी उप आयुक्त
(एकत्रीकरण)